# 'प्रसिध्दी पत्रक'
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**मंगळवार, दि.२४/०३/२०२०**
**वेळ: १९.००**

## "मनाई आदेश झुगारुन दुकाने चालू ठेवणाऱ्यां व गोंधळ घालणाऱ्यांविरुध्द्, १६ गुन्हे दाखल."

**उस्मानाबाद जिल्हा:** संसर्गजन्य आजार कोरोनाच्या प्रसारास प्रतिबंध व्हावा, गर्दी टाळावी या उद्देशाने जिल्ह्यातील पानटपरी, हॉटेल, दुकाने, बेकरी इत्यादी बंद ठेवण्याचा शासनाचा आदेश झाला आहे. असे असतांनाही मोहन परमानंद मेहता, अतुल राम वडतिले, निवृत्ती सोपान काळे, तीघे रा. वाशी, नाजिर गैबी मुलाणी, ज्ञानेश्वर विश्वनाथ मोरे, नेताजी शिवाजी चौधरी तीघे रा. तुळजापूर, युसुफ महमद शेख रा. नळदुर्ग, मुरलीधर चौथमल चांडक, संजय अभिमन्यु घोगरे दोघे रा. उस्मानाबाद, बळीराम अनंत क्षिरसागर, रा. येडशी, ता. उस्मानाबाद या सर्वांनी आपापल्या गावी दि. २३.०३.२०२० रोजी हा मनाई आदेश झुगारुन पानटपऱ्या, दुकाने, हॉटेल इत्यादी चालू ठेउन विक्री करुन लोकांची गर्दी निर्माण केली.

तर सी.आर.पी.सी. कलम- १४४ अन्वये जमावबंदी आदेश अंमलात असतांनाही शहाबाज शेख, भारत शिंदे, धिरज भांगे, सुलेमान इनामदार, अशोक बांगर, अजय शिंदे, अविनाशकुमार सिंग, यांनी सर्व येरमाळा येथे तर अशोक कात्रे, देवानंद गायकवाड दोघे रा. मसोबाची वाडी, आकाश दरवडे, बालाजी मोरे, ज्ञानेश्वर कवडे तीघे रा. वाशी यांनी तेरखेडा येथे तर इरफान कुरेशी, इमरान कुरेशी, शाहबाज सौदागर तीघे रा. उस्मानाबाद यांनी उस्मानाबाद येथे तर परमेश्वर माने, ज्ञानेश्वर शिंदे, उमेश काळदाते, शिवराज बचाटे, दत्ता मस्के रा. काक्रंबा, जनार्धन माने, आकाश माने, प्रमोद भोरे, वैजीनाथ पवार, आदर्श घाटशिळे, ओंकार हुंडकरी, स्वप्नील मोरे सर्व रा. तुळजापूर यांनी तुळजापूर येथे दोन वेगळया ठिकाणी तर लिंबराज टेकाळे, धनराज इंगोले, सुमेश डिकले, आकाश माळी, अक्षय वडे, आकाश गुंठाळ, सुभंकर जोशी, आदित्य काटे, आकाश करवा, सुरज करडे सर्व रा. कळंब यांनी कळंब येथे आरडा-ओरड करुन गोंधळ घालत असतांना पोलीस पथकास आढळुन आले. अशा प्रकारे त्यांनी लोकसेवकाने (जिल्हाधिकारी) दिलेल्या कायदेशीर आदेशाचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्याबद्दल भा.दं.वि. कलम- १८८, सह म.पो.का. कलम- १३५, ११०/११७ सह, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम क्र. ११ अन्वये वरील सर्वांविरुध्द स्वतंत्र १६ गुन्हे संबंधीत पो.ठा. येथे दि. २३.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आले आहेत.

## "रस्ता अपघात, एक मयत."

**पोलीस ठाणे, आंबी:** शरद जरांडे रा. शेळगांव, ता. परंडा हे दि. १२.०३.२०२० रोजी १३.३० वा. सु. मो.सा. वर अंकुश शेंडकर यांना घेउन जात असतांना निष्काळजीपणे मोटारसायकल चालवून मौजे शेळगांव येथील माणिक बाबा विद्यालया जवळील रस्त्याच्या बाजूस मोटारसायकलसह उभ्या असलेल्या पोपट कुटे यांच्या

मो.सा. ला समोरुन धडक दिली. या अपघातात अंकुश शेंडकर हे मयत झाले तर उभ्या मो.सा. वरील पोपट कुटे हे जखमी झाले. अशा मजकुराच्या अकस्मात मृत्युच्या चौकशीत पोपट कुटे रा. सोनगिरी, ता.भुम यांनी दिलेल्या जबाबावरुन शरद जरांडे यांच्या विरुध्द निष्काळजीपणे मृत्युस कारणीभुत झाल्याबद्दल गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "पोलीसांच्या कामात अडथळा, गुन्हा दाखल."

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** तुळजापूर पो.ठा. चे पोउपनि श्री. गणेश झिंजुर्डे हे जमावबंदीच्या काळात पोलीस पथकासह कोरोना पार्श्वभुमीवर तुळजापूर शहरात दि. २३.०३.२०२० रोजी २०.४५ वा. सु. गस्त करुन जनजागृती करत असतांना त्यांना रस्त्यात एक टोळके उभे असलेले दिसले. त्यास हटकता त्यातील अभिजीत राजा माने रा. हडको, तुळजापूर याने पोलीस पथकास धक्काबुक्की करुन "तुम्हास नोकरी करने मुश्कील करेन." अशी धमकी देउन पोलीसांच्या शासकीय कर्तव्यात जाणीवपुर्वक अडथळा निर्माण केला. अशा मजकुराच्या पोउपनि श्री. गणेश झिंजुर्डे यांनी सरकार तर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन वरील आरोपीविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "अल्पवयीन मुलीचे अपहरण."

**पोलीस ठाणे, कळंब:** एका १७ वर्षीय मुलीचे गावातीलच एका तरुणाने आमिष दाखवून दि. २०.३.२०२० रोजी अपहरण केले आहे. अशा मजकुराच्या अपहृत मुलीच्या पित्याच्या फिर्यादीवरुन संबंधीत तरुणाविरुध्द गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "जनावरांची निर्दयीपणे वाहतुक, गुन्हा दाखल."

**पोलीस ठाणे, भुम:** राजा माणिक सोनार रा. नेवासा, जि.अहमदनगर हा दि. २४.०३.२०२० रोजी ००.१० वा. सु. गोलाई चौक, भुम येथे ट्रक क्र. एम.एच. १६ सीसी २९२९ मधुन ९ म्हशी व ७ रेडके दाटीवाटीने भरुन, त्यांच्या अन्नपाण्याची व्यवस्था न करता निर्दयीपणे वाहतुक करत असतांना पो.ठा. भुम यांच्या पथकास आढळले. यावरुन वरील आरोपींविरुध्द प्राण्यांचा छळप्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दि. २४.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "आर्थिक व्यवहारावरुन मारहाण."

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** उमेश आण्णा सातपुते रा. डुक्करवाडी, ता. भुम हे दि. २२.०३.२०२० रोजी १९.०० वा. सु. दिपक टाक रा.सुकटा, ता.भुम यांना उसने दिलेले पैसे मागण्यासाठी त्यांच्या गावी गेले होते. यावेळी मौजे सुकटा येथील बबन गलांडे, सचिन मस्के, संपत नारायण गलांडे, शांताराम नरके, संतोष शिंदे, बलु कांबळे यांनी बेकायदेशीर जमाव जमवून उमेश सातपुते यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, वायरने, पट्ट्याने मारहाण करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या उमेश सातपुते यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द गुन्हा दि. २३.०३.२०२० रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन १२९ कारवाया.”**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. २३/०३/२०२० रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व शहर वाहतुक शाखा-उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार १२९ कारवाया केल्या असुन त्यातुन १८,२०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

---

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद